म.रा.मा.प.महामंडळ,यं.अ. खाते, महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई ४०० ००८

संदर्भ क्र.राप/यंअ/देखभाल/१०५७ दिनांक : १३.३.२०१२

**परिपत्रक क्र.१/२०१२**

प्रादेशिक व्यवस्थापक, (प्रादेशिक अभियंता यांचे अवलोकनार्थ)
रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा
पुणे / नागपूर / औरंगाबाद.
विभाग नियंत्रक, (यंत्र अभियंता (चा)यांचे अवलोकनार्थ)

मुख्य अभियंता(सं.व वि.),
मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी-पुणे.

रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई / पालघर / पेण / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / नाशिक / जळगांव / धुळे / अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / भंडारा / चंद्रपूर /वर्धा/ अमरावती / अकोला / बुलढाणा / यवतमाळ.

यंत्र अभियंता (चालन),
रा.प.विभागीय कार्यशाळा,बारामती/श्रीरामपूर.

विषय : आर आर ३ ग्रिस वापरुन व्दैमासिक डॉकींग ऐवजी
तिमाही डॉकींग सुरु करणे बाबत .
संदर्भ : महामंडळ ठराव क्र.२०१२:०२:०३,दिनांक २८.२.१२

मे.टाटा मोटर्स व मे.अशोक लेलँन्ड या चासी उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी त्यांचे चॅसीवरील व्हील हब व बेअरींगसाठी आर आर-३ प्रकारचे सुधारीत ग्रिस वापरण्याबाबत शिफारस केलेली आहे. या शिफारसीनुसार हे सुधारीत आरआर-३ ग्रिस वापरुन हब व्हील बेअरींग मधील ग्रिस पूर्ण बदलणेचा कालावधी कंपनीने प्रत्येक ३६,००० कि.मी. असा दिला होता. यानुसार रा.प. महामंडळातील गाडयांचे दैनिक कि.मी. पहाता हब बेअरींगचे ग्रिस बदलून दर २ महिन्या ऐवजी दर ३ महिन्यांनी संपूर्ण डॉकींग करण्यास महामंडळाने ठराव क्र.२०१२:०२:०३,दिनांक २८.२.१२ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

वरिल ठरावास अनुसरुन सूचना देण्यात येतात की, रा.प. महामंडळातील प्रत्येक गाडीचे डॉकींग हे दर दोन महिन्याऐवजी तीन महिन्यांनी करण्यात यावे व याची अंमलबजावणी हे परिपत्रक मिळताच करण्यात यावी. या संबंधी खालील महत्वाच्या बाबींकडेही काळजीपूर्वक लक्ष द्यावे.

१) दर ३ महिन्यांनी डॉकींग करताना व्हील हब व बेअरींगसाठी आर आर-३ प्रकारचेच **(कोड नं.१८०२१०२२२३ ग्रीसचे Description** RR३ Grease confirming to IS १२२०३ NLGI Grade III ) ग्रीस वापरावे.
२) शॅकल पीनस्, हॅंगर ब्रॅकेट, प्रोपेलर शाफ्ट इत्यादी ग्रीसींग करण्याच्या ठिकाणी एमपी३ ग्रीस वापरण्यात यावे.

३) दर ३ महिन्यांनी डॉकींग करताना हब ग्रिस बदलणे व डॉकींगमध्ये करण्यात येणारी इतर सर्व इंजिन, ट्रान्समिशन, सस्पेंन्शन, ब्रेक, स्टेअरिंग व इलेक्ट्रीकल सिस्टीम इत्यादी मधील देखभाल व दुरुस्तीची कामे काटेकोरपणे व न चुकता करावीत.

४) कोणत्याही गाडीचे तिमाही डॉकींग अजिबात चुकणार नाही याची कटाक्षाने खबरदारी घ्यावी.

५) तिमाही डॉकींग केल्यानंतर प्रत्येक वाहनांवर बारीक लक्ष ठेवावे.

६) सदरचा बदल आपल्या विभागातील सर्व संबंधीत अधिकारी व पर्यवेक्षक यांना लेखी सूचनेव्दारे अवगत करावा.

७) वरिल बदलास अनुसरुन भांडार विभागाने डॉकींगसाठी आवश्यक असलेल्या **आरआर३ ग्रीसचा** पुरवठा करावा तसेच इतर सामाना बाबत पुर्नविचार करुन आवश्यक तेवढेच सामान खरेदी करणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

८) प्रत्येक महिन्याला यंत्र अभियंता(चा) यांनी सदर तिमाही डॉकींग बाबत आढावा घ्यावा व प्रत्येक महिन्याला सदर बदलाचे परिणामांची कारणमिमांसा या खात्यास पाठवावी.

९) सदर बदलामुळे आगार पातळीवरील तसेच विभागीय कार्यशाळा पातळीवर होणारा सुधारीत वार्षिक वर्कलोड कळविण्यात यावा.

१०) एक वर्षानंतर संपूर्ण कार्यवाहीचा तपशील यंत्र अभियंता(चा) यांच्या अभिप्रायासह या खात्यास पाठवावा, म्हणजे संचालक मंडळास त्या प्रमाणे अवगत करण्यात येईल.

वरिल सूचना त्वरीत अंमलात आणून पत्राची पोहच द्यावी.

सही/—
महाव्यवस्थापक (यं.अ.)

प्रत : महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन)/महाव्यवस्थापक(भां.व ख.)/ महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)/ उप महाव्यवस्थापक (संगणित्र)/ उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण)/ मुख्य सांख्यिक/ सचिव,रा.प.महामंडळ यांना माहितीसाठी व वरिल विषयी आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव यांस अध्यक्षांचे माहितीसाठी.
प्रत : मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांस उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे माहितीसाठी.

महाव्यवस्थापक (यं.अ.)

MNT-AIIST RR3 Paripatrak